महाराष्ट्र शासन -कृषि विभाग

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

३०, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४०० ००५.

दूरध्वनी क्र.०२२- २२१६३३५१ email: mahapocra@gmail.com

जा. क्र. नादेकृसंप्र-०३२५/प्रशिक्षण/प्रक-५७/२०२४-२५ /२६३ दिनांक २५.०३.२०२५

प्रति,

विभागीय कृषि सहसंचालक (अमरावती, छत्रपती संभाजी नगर, नाशिक, लातूर व नागपूर)

**विषय:- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत ग्राम कृषि विकास समिती सदस्य आणि स्वयंसेवक यांचे नियोजित एकदिवसीय प्रशिक्षणाच्या पूर्वतयारी बैठकीबाबत.**

**संदर्भ:-** १. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. नादेकृ ४६२२/प्रक्र ९४/८ए दि. ३०.६.२०२३

२. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. नादेकृ ४६२२/प्रक्र-९४/८अ, दि.१४.१०.२०२४

३. या कार्यालयाचे पत्र क्र. २३९, दि. १७.०३.२०२५

महोदय,

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ करिता संदर्भ क्र. ३ चे पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रकल्प जिल्ह्यातील ग्राम कृषि विकास समितीच्या सदस्य आणि प्रकल्प गावामध्ये निवडण्यात आलेल्या स्वयंसेवकाकरिता **दि. २ एप्रिल २०२५, रोजी बुधवारी, सकाळी १०.३०** वाजता **एकदिवसीय "प्रकल्प ओळख"** विषयक प्रशिक्षण प्रत्येक कृषि सहाय्यक यांचे सजामधील **ग्रामपंचायत / गाव समूह स्तरावर ग्रामपंचायत कार्यालयाच्या** ठिकाणी आयोजित केलेले आहे. नियोजित प्रशिक्षणामध्ये मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री (कृषि) यांचे ध्वनीमुद्रित दूरचित्रवाणी (Video Recorded) संदेश द्वारे दूरस्थ पद्धतीने (प्रकल्पाचे युट्यूब चॅनेल द्वारे) आणि मा. प्रधान सचिव (कृषि) हे प्रत्यक्ष सवांदाद्वारे उपस्थित प्रशिक्षणार्थी यांना मार्गदर्शन करणार आहेत.

उपरोक्त विषयान्वये आयोजित केलेल्या एकदिवसीय प्रशिक्षणाच्या पूर्वतयारी करीता उद्या दि. २६ मार्च २०२५ रोजी, सकाळी ११.३० वाजता online बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. नियोजित बैठकीकरिता प्रकल्पातील जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, प्रकल्प संचालक (आत्मा), उपविभागीय कृषि अधिकारी आणि तालुका कृषि अधिकारी, ~~मंडळ कृषि अधिकारी~~, ~~प्रकल्प सहायक~~, ~~प्रकल्प विशेषज्ञ आणि कृषि सहाय्यक~~ यांना उपस्थित राहनेकामी आपले स्तरावरून सूचित करण्यात यावे. सदर पूर्वतयारी बैठकीकरिता लिंक या कार्यालयाकडून पाठविण्यात येईल.

२५/३/२५

सहाय्यक प्रकल्प संचालक

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई

**प्रत माहितीस्तव:**

१. **मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (प्रकल्पातील सर्व)**

**प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तव:**

१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (प्रकल्पातील सर्व)
२. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पातील सर्व)
३. प्रकल्प संचालक (आत्मा) (प्रकल्पातील सर्व)
४. उपविभागीय कृषि अधिकारी (प्रकल्पातील सर्व)
५. गट विकास अधिकारी (प्रकल्पातील सर्व)
६. तालुका कृषि अधिकारी (प्रकल्पातील सर्व)